CMYK

मुंगळा येथे ढगफुटीप्रमाणे मुसळधार पाऊस सुरू >> पान 3

पोळ्यानिमित्त रविकांत तुपकरांनी सहपरिवार केले बैलांचे पूजन >> पान 4

ई-पिक पाहणीसाठी १५ सप्टेंबर अंतिम मुदत >> पान 4

**सुविचार**

सर्वात मोठे यश हे सर्वात मोठ्या निराशेनंतरच मिळते.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज 'वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्त्व' ग्रंथाचे प्रकाशन

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई


■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 27 ■ मंगळवार, दि. 03 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# मराठवाड्यात पावसाचा धुमाकूळ! नद्यांना पूर

## जनावरं वाहून गेली तर हिंगोलीत २५ जण पुरात अडकले

**मुंबई/ प्रतिनिधी** : मुंबईसह पुण्यात पावसाने दांडी मारली असली तरी विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाने थैमान घातलं. अतिवृष्टीमुळे हिंगोली, यवतमाळ, वाशिम, परभणी, नांदेडला मोठा फटका बसलाच चित्र आहे. मराठवाडा आणि विदर्भाला जोडणाऱ्या रस्त्यांवरही परिणाम झालाय.









मराठवाड्यात पावसानं धुमाकूळ घालाय. पुराच्या पाण्यात बस वाहून गेलीय. मानवत तालुक्यातील वझुर बुद्रुक गावात पाथरी आगाराची मुक्कामी असलेली बस पुराच्या पाण्यात वाहून गेल्याची घटना घडली आहे. बसमध्ये चालक सुदाम दहे आणि वाहक शिवाजी देशमुख झोपलेले होते. बस मध्ये पाणी शिरल्याचा आवाज येत असल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी बस चालू करण्याचा प्रयत्न केला. मात्र बस चालू झाली नाहीय.. काही वेळेतच बस पुराच्या पाण्यातून वाहून गेली.. चालकांनी प्रसंगावधान राखून गाडीतून उडी घेतल्यानं त्यांचे प्राण वाचलेत.

हिंगोली जिल्ह्यात पावसानं कहर केलाय. कळमनुरी तालुक्यात आखाडा बाळापूरमध्ये पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालंय. देवजना परिसरात पुराच्या पाण्यात २५ जण अडकलीयेत. यासोबतच जनावरंही पुरात अडकलीये. वाढता पाऊस बघून नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी आसरा घेतला होता. मात्र अल्पावधीतच पुराचं पाणी वाढल्यानं संपूर्ण जिल्ह्याला पुरानं वेढा घातलाय. यामुळे अनेक जनावर पाण्यात अडकल्याचं दिसून आलं.

परभणीत मुसळधार पावसामुळे करपरा नदीला पूर आलाय. मात्र यामुळे पुरात शेकडो जनावरे वाहून गेलीय. अनेक गावात पाणी ही शिरलं, असून पुरात अनेक गाड्या वाहून गेल्यात. तसंच शेती पिकांचे ही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. गावात घरांची पडझड झालीय. यामुळे नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्यात येत आहे. तसंच प्रशासनाने नागरिकांना ही सतर्कतेचा इशारा दिलाय.

बीड जिल्ह्यात गेल्या २४ तासापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पिके पाण्याखाली गेली आहेत. यात सोयाबीन, मूग उडीद आणि कापूस यां खरीप पिकांचे प्रचंड नुकसान झाले. त्यामुळे हातात तोंडाशी आलेला घास पुन्हा एकदा निसर्गाने हिरावून घेतला आहे. तसेच उर्वरित पिके पाण्याखाली असल्याने शेतकरी चिंतेत आहे बीडच्या शिदोड यांच्या शेतात काढून ठेवलेल्या मुगाच्या पिकात पाणी साचल्याने दोन एकर मुगाचे नुकसान झाले आहे.. तर तळ्याचे रूप आले आहे.

लातूर जिल्ह्यात २४ तासांपासून मुसळधार पावसाने दाणादाण उडवलीय. तेरणा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून नदीवरील सर्व दरवाजे ३० सेंटीमीटरने उघडून पाण्याचा विसर्ग केला जातोय. शेकडो हेक्टरवरची पिकं पाण्याखाली जाण्याची भीती व्यक्त होतेय. हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केलाय .प्रशासनाने नदीकाठच्या १०० गावांना >> पान २

# वनराज आंदेकरांवर बहिणीच्या पतीकडून गोळीबार; मालमत्तेच्या वादातून आंदेकरांचा खून

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/ प्रतिनिधी** : राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्यावर पिस्तुलातून गोळीबार करण्यात आल्याची खळबळजनक घटना रविवारी रात्री नाना पेठेत घडली. रात्री उशिरा खासगी रुग्णालयात उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला. आंदेकर यांच्या मेहुण्याने त्यांच्यावर पिस्तुलातून गोळीबार केल्याचे उघड झाले असून, या घटनेनंतर नाना पेठेत घबराट उडाली आहे.

वनराज आंदेकर रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास नाना पेठेतील डोके तालीम परिसरात थांबले होते. त्या वेळी त्यांच्यावर हल्लेखोरांनी पिस्तुलातून पाच ते सहा गोळ्या झाडल्या. तसेच, कोयत्याने वार केले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला. नाना पेठ परिसरात आंदेकर टोळीचा दबदबा आहे. त्यामुळे वनराज आंदेकर यांच्यावर हल्ला झाल्याची माहिती मिळाल्यानंतर परिसरात घबराट उडाली. वनराज यांच्यावर त्यांच्या बहिणीचा पती गणेश लक्ष्मण कोमकर, सोमनाथ सयाजी गायकवाड, तुषार कदम यांनी गोळीबार केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. कौटुंबिक वादातून कोमकरने गोळीबार केल्याची माहिती प्राथमिक तपासात मिळाली आहे. कोमकरने काही वर्षांपूर्वी शिवसेनेचे शहर प्रमुख रामभाऊ पारिख यांच्यावर अॅसीड हल्ला केला होता. २८ ऑगस्ट रोजी कोमकरने वनराज आंदेकर आणि त्यांच्या भावाविरुद्ध मालमत्तेच्या वादातून समर्थ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यात धुसफूस सुरू होती.

# मेहकर येथे शेतकऱ्यांनी साजरा केला अभिनव ट्रॅक्टर पोळा

## ट्रॅक्टर सारथी होऊन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव झाले ट्रॅक्टर पोळ्यात सहभागी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/ प्रतिनिधी** : राज्यात सर्वत्र बळीराजाचा सर्वात महत्त्वाचा सण बैलपोळा साजरा होत आहे...आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात ट्रॅक्टरच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणत शेती उपयोगी कामे केली जातात आजच्या शेतीमध्ये बैलांची आणि ट्रॅक्टर यांची उपयोगिता सारखीच असल्याने बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर येथे पोळ्यानिमित्त ट्रॅक्टर पोळ्याचे आयोजन करण्यात आलं होतं या ट्रॅक्टर पोळ्यामध्ये केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव सहभागी झाले होते.

शेतकऱ्यांसोबत रात्रंदिवस शेतात राबणाऱ्या बैलाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याच्या दृष्टिकोनातून सर्वत्र पोळा हा सण साजरा केला जातो परंतु आजच्या आधुनिक युगामध्ये शेतकऱ्याकडील बैल जोड्यांची संख्या कमी झाली आहे .

शेतीच्या कामगिरी आता ट्रॅक्टरचा उपयोग केला जातो किंबहुना त्या माध्यमातून शेतीची कामे केले जातात त्यामुळे पोळ्या सारखे सण उत्सव हे पुढेही




कायम राहावे या दृष्टिकोनातून बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर येथे शेतकरी बांधवांच्या वतीने एक आगळा वेगळा पोळा साजरा करत एक आभीनव मिरवणूक मेहकर शहरातील मुख्य मार्गाने काढण्यात आली.

या ट्रॅक्टर पोळ्यामध्ये जवळपास १५० ते २०० ट्रॅक्टर सहभागी झाले होते.. जे वर्षभर आपल्या बळीराजा करिता शेतात सर्जा राजाच्या बरोबरीने आजच्या आधुनिक युगात योगदान देत असतात असे ट्रॅक्टर देखील आज आपल्याला शहरातील रस्त्यावर दिसुन आले. या ट्रॅक्टर पोळ्यामध्ये केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव आमदार संजय रायमुलकर युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव यांच्यासह शेकडो शेतकरी आपले ट्रॅक्टर घेऊन या ट्रॅक्टर पोळ्याच्या रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

# मालकाच्या सोयाबीनला ६ हजार रुपये भाव द्या

## पोळ्यानिमित्त शेतकऱ्यांनी केली अनोख्या पद्धतीने मागणी





तलाठी अमोल राठोड व अनुप नरोटे तसेच प्रविण परमाळे संदीप परमाळे

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/विशेष प्रतिनिधी** : शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून वर्षातील सर्वात महत्त्वाचा सण म्हणजे पोळा. हा सण सर्जा-राजाला समर्पित असून, या सणानिमित्त गावागावांत सामाजिक सलोखा राखण्यासाठी पोषक वातावरण निर्माण होते. पोळ्याच्या सणाला गावातील सर्व जाती-धर्माचे लोक बैलांच्या मिरवणुकीसोबत पोळा भरण्याच्या ठिकाणी एकत्रित होऊन एकमेकांशी भेट घेण्याची परंपरा कायम आहे. या सणानिमित्त गावात सलोखा आणि शांततेचे वातावरण निर्माण होण्यास मदत होते. कृषी कार्यात हजारो वर्षांपासून जनावरांचा उपयोग फार महत्त्वाच्या ठरलेला आहे. त्यात शेतीची मशागत करण्यासाठी बैलजोडीचा उपयोग सर्वात महत्त्वाचा राहिलेला आहे. मात्र आज पोळ्याचे औचित्य साधून डोणगाव येथे आमच्या मालकाच्या सोयाबीनला सहा हजार रुपये भाव द्या. अशी मागणी शेतकऱ्यांनी शासनाचे लक्ष वेधण्या साठी पोळ्याच्या बैलाच्या माध्यमातून व्यक्त केली.


विदर्भातील प्रमुख अश्या सोयाबीन पिकावर सुलतानी संकट दाटून आलेले असल्याने सोयाबीन पिकाला ३ हजाराच्या जवळपास भाव येत असून त्यातून खर्च निघणे सुद्धा मुश्किल आहे अश्यात पोळ्याच्या बैलाच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी खंत व्यक्त केली. सोयाबीन या पिकाला सध्या बाजारात ३ हजार ते ३५०० भाव असून त्यातून शेतकऱ्याचा केलेला खर्च सुद्धा निघणे मुश्किल आहे अश्यात आपली खंत शासन दरबारी पोचावी या साठी डोणगाव येथील सार्वजनिक पोळ्यात खंत व्यक्त करणारे संदेश असलेले पोळ्याचे बैल पहायला मिळाले ज्यात भारतीय जनता पार्टी ने लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अबकी बार ४०० पार हा नारा देण्यात आला होता तेव्हा त्याच चुनावी नाऱ्याला प्रतिउत्तर देत अबकी बार सोयाबीन ६ हजार पार बैलाच्या अंगावर लिहून खंत व्यक्त केली तर दुसरीकडे काही बैलांच्या डोक्यावर मालकाच्या सोयाबीनला ६ हजाराचा भाव मिळाला पाहिजेत अशी खंत व्यक्त करणारा संदेश देवून शासनाचे लक्ष वेधण्याचे प्रयत्न केले अश्यात शासन याकडे किती गंभीर्याने पाहते आणि शेतकऱ्याच्या मालाला भाव देते हे पाहण्यास योग्य ठरेल. यावेळी डोणगाव चे सरपंच शिवचरण विजयराव आखाडे. ग्रामपंचायत सदस्य व प्रतिष्ठित नागरिक यांच्या हस्ते सार्वजनिक पोळ्याचे पूजन करण्यात आले. यानिमित्त मोठ्या संख्येने शेतकरी बांधवांची उपस्थित दिसून आले.

> बैलपोळाच्या माध्यमातून आम्ही सर्व शेतकरी बांधव सोयाबीनला सहा हजार रुपये भाव द्या अशी मागणी आज बैल पोळ्यानिमित्त करत आहो. ग्रामपंचायतीने आयोजित केलेला सार्वजनिक पोळ्यात आपल्या बैलाच्या सिंहाला संदेशाचे फलक लावून सहा हजार रुपये सोयाबीनला भाव द्या आम्हा शेतकरी बांधवांची मागणी आहे. ही मागणी शासनाने तात्काळ पूर्ण करावी.
>
> **-शिवचरण आखाडे पाटील**
> **सरपंच, डोणगाव**

### बैलाच्या अंगावर लिहून पिक पेरा करुन घेण्याचे आवाहन

डोणगांव येथे सार्वजनिक पोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी बळीराजा यांनी आपले बैल सजवून पोळ्यात आणले होते. यावेळी १५ सप्टेंबर पुर्वी ई पीक पेरा करुन घेण्याचे आवाहन करणारा बैल व सोयाबीन ला सहा हजार रुपये भाव देण्याची मागणी करणारा बैल पोळयामध्ये आकर्षणाचा विषय ठरला तर याच वेळेस महसूल चे तलाठी अमोल राठोड व अनुप नरोटे तसेच प्रविण परमाळे संदीप परमाळे संतोष मानवतकर यांनी पोळयामध्ये ई पीक पेरा शेतकरी बांधवांनी १५ सप्टेंबर पुर्वी करावे यासाठी जनजागृती करताना दिसून आले.

# पुराच्या पाण्यात एसटी बस गेली वाहून, मानवत तालुक्यातील घटना



दैनिक आपला विदर्भ

**परभणी/ प्रतिनिधी** : परभणी जिल्ह्यात आज सोमवारी पावसाची संततधार सुरूच असून सलग तिसऱ्या दिवशीही सूर्यदर्शन झालेच नाही. या पावसाने जिल्ह्यातील लघु व मध्यम सिंचन प्रकल्प भरले असले तरी नदी व ओढ्याकाठच्या शिवारात पाणीच पाणी साचल्याने कापूस सोयाबीन या पिकांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. शेकडो एकर शिवारातील ही पिके गेल्या तीन दिवसांपासून पाण्यात असल्याने मोठा फटका बसण्याची भीती निर्माण झाली आहे.

पुराच्या पाण्यात परिवहन महामंडळाची बस वाहून गेल्याची घटना मानवत तालुक्यातील वझुर (बु.) या गावी पहाटे चारच्या सुमारास घडली. वझुर गावी पाथरी आगाराची ही बस मुक्कामी होती. चालक सुदाम दहे आणि वाहक शिवाजी देशमुख हे दोघे बसमध्ये झोपलेले होते. पहाटे बसमध्ये पाणी शिरल्याचा आवाज येत असल्याचे लक्षात आल्यावर दोघांनी बस चालू करण्याचा प्रयत्न केला. परंतु बस चालू होण्यास वेळ लागला. तो पर्यंत एक मोठा पाण्याचा लोंढा आला आणि बस जागा सोडून वाहू लागली. प्रसंगावधान राखून चालक व वाहक यांनी बसमधून उड्या मारल्या व जीव वाचवला. बस शंभर मीटर पेक्षा अधिक दूर पाण्यात वाहून गेली. एका खांबाजवळ जावून ही बस अडकल्याची माहिती आहे.

CMYK

## विद्यार्थ्यांच्या चिंताजनक आत्महत्या

भारतातील विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांबाबत एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. मागील आठवड्यात नॅशनल क्राईम ब्युरोच्या डेटावर आधारित स्टुडंट्स सुसाईड : अन अपेडेमिक स्वीपिंग इंडिया नावाचा अहवाल वार्षिक आयसी ३ परिषद आणि आणि एक्स्पो २०२४ मध्ये जाहीर करण्यात आला. हा अहवाल अतिशय धक्कादायक आहे कारण या अहवालात आपल्या देशातील आत्महत्यांचे वास्तव मांडण्यात आले आहे. या अहवालानुसार देशातील आत्महत्यांच्या दरात कमालीची वाढ झाली आहे. यावर्षी देशभरात ७० हजारांहून अधिक नागरिकांनी आत्महत्या केल्या असून यात सर्वात जास्त आत्महत्या पुरोगामी महाराष्ट्रात झाल्या आहेत. त्यातही धक्कादायक आणि चिंताजनक बाब म्हणजे यात सर्वाधिक आत्महत्या विद्यार्थ्यांच्या आहेत. त्यातही पुरोगामी महाराष्ट्राचा पहिला क्रमांक लागतो. महाराष्ट्रात सर्वाधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. महाराष्ट्रानंतर तामिळनाडू, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, झारखंड या राज्याचा क्रमांक लागतो. विद्यार्थी आत्महत्येत महाराष्ट्र अव्वल क्रमांकावर असणे ही भूषणावह बाब नसून शिव, फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्राला खाली मान घालायला लावणारी ही बाब आहे. कणखर देशा राकट देशा दगडांच्या देशा असा महाराष्ट्राचा उल्लेख होतो त्यात दुर्दैवाने आत्महत्यांच्या देशा असेही नमूद करावे लागत आहे. आज जगातील सर्वाधिक लोकसंख्या भारतात आहे आणि यात सर्वात जास्त तरुणांची संख्या आहे. भारतात तरुणांची संख्या जवळपास ६० टक्के इतकी आहे. इतके तरुण जगातील कोणत्याच देशात नाहीत म्हणूनच भारताकडे आगामी महासत्ता म्हणून पहिले जाते. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्र्वास होता. तरुणांच्या जोरावरच भारत जागतिक महासत्ता बनेल असा विश्र्वास त्यांना होता. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता बनण्याची स्वप्ने पाहत आहोत तोच तरुण जर असा अकाली मृत्यूला कवटाळू लागला तर देशाच्या भविष्यावरच प्रश्र्न चिन्ह निर्माण होऊ शकते म्हणूनच विद्यार्थ्यांच्या या आत्महत्या राज्यकर्त्यांनी गांभीर्याने घ्याव्यात आणि आत्महत्या कमी रोखण्यासाठी ठोस धोरण आखायला हवे. अर्थात विद्यार्थी आत्महत्या का करतात याचाही विचार व्हायला हवा. विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांमागे अनेक करणे आहेत त्यातील प्रमुख कारण म्हणजे पालकांच्या मुलांकडून अनाठायी अपेक्षा. शिक्षणातील भयंकर स्पर्धा, गुणांची जीवघेणी चढाओढ, शिक्षण घेऊनही रोजगार न मिळणे, प्रेमभंग या आणि अशा अनेक कारणांमुळे तरुण अकाली मृत्यूला कवटाळीत आहेत. समाज माध्यमांचा वाढता प्रभाव हे देखील विद्यार्थी आत्महत्यांच्या कारणांपैकी महत्वाचे कारण आहे. समाज माध्यमांच्या आहारी गेल्यामुळे मुले खूप भावनिक झाली आहे. आपल्या भावनांना आवर न घालता आल्याने मुले आत्महत्येचा मार्ग स्वीकारीत आहेत. ब्लू व्हेल, पोकोमन यासारख्या हिंसक गेम्समुळे देखील अनेक मुलांनी आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. विद्यार्थ्यांना पालकांकडून हल्ली अनेक गोष्टी सहज उपलब्ध होऊ लागल्या आहेत त्यामुळे एखादी गोष्ट जेंव्हा मिळत नाही तेंव्हा ती मिळावी यासाठी विद्यार्थी अट्टाहास करतात मग त्यांना त्यात अप्याश आले की ते मृत्यूला कवटाळतात म्हणून पालकांनी मुलांना नकार पचवायला शिकवले पाहिजे. पालकांनी मुलांवर अपेक्षांचं ओझेही लादू नये. विद्यार्थी आत्महत्या म्हणजे देशाची मोठी हानी त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्याची जबाबदारी केवळ पालकांचीच आहे असे नाही तर शाळा, कॉलेज, शिक्षक, समाज आणि शासनाचीही आहे. या सर्व घटकांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखणयासाठी प्रयत्न करायला हवेत.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज 'वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्त्व' ग्रंथाचे प्रकाशन

## 'उत्कृष्ट संसदपटू' आणि 'उत्कृष्ट भाषण' पुरस्कारांचे वितरण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/ प्रतिनिधी** : महाराष्ट्र विधानपरिषद शतक महोत्सवानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 'वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्त्व' या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा उद्या आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी उत्कृष्ट संसदपटू' आणि 'उत्कृष्ट भाषण' पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. हा कार्यक्रम उद्या, ३ सप्टेंबर




२०२४ रोजी दुपारी ३:३० ते ५ या वेळेत मध्यवर्ती सभागृह, विधानभवन, मुंबई येथे होणार आहे.

या कार्यक्रमाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

## बाप्पा येणार आणि सुट्ट्याही! विद्यार्थ्यांची मजा; सप्टेंबरमध्ये इतके दिवस शाळा, कॉलेज बंद

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/ प्रतिनिधी** : प्रत्येक महिना सुरु झाला की विद्यार्थी आपल्या शालेय डायरीमध्ये किती सुट्ट्या आहेत? याचा शोध घेत असतात. सप्टेंबर महिना हा अनेक सण घेऊन आलाय. त्यात मुलांच्या लाडक्या बाप्पाचं आगमनदेखील याच महिन्यात आहे. सप्टेंबरमध्ये ईद देखील आहे. त्यामुळे शालेय आणि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना सुट्ट्यांचा आनंद घेता येणार आहे. या सुट्ट्यांनुसार विद्यार्थ्यांच्या पालकांनादेखील त्यांच्या सुट्ट्या मॅनेज करता येणार आहेत. कारण सुट्ट्यांचे दिवस एकत्र करुन अनेक कुटुंबा आपल्या गावी किंवा शहराबाहेर फिरण्याचे प्लान आखतात. त्यामुळे शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना नेमक्या किती दिवस सुट्ट्या असणार, याची यादी जाणून घेऊया. सप्टेंबर २०२४ मध्ये शाळा आणि कॉलेज खुले राहणार आहेत. पण सण आणि सुट्ट्यांमुळे त्यांना आपल्या आवडत्या कांमासांठी वेळ काढता येणार आहे. शाळा, कॉलेजच्या सुट्ट्या या देशभरातील विविध राज्य, क्षेत्र आणि शैक्षणिक संस्थानुसार वेगवेगळ्या असतील, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्या.

ओणम हा हिंदु धर्मातील महत्वाचा सण असून तो केरळमध्ये मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. ५ सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांना शाळेची सुट्टी आहे. केरळवासियांसाठी हा एक प्रमुख वार्षिक उत्सव आहे. हा या राज्याचा अधिकृत सण असून यावेळी राज्यभरात अनेक सास्कृतिक कार्यक्रम होतात. गणेश चतुर्थी हा देशातील विविध भागात साजरा केला जाणारा सण आहे. प्रामुख्याने संपूर्ण महाराष्ट्रात आणि कर्नाटकात मोठ्या उत्साहात हा सण साजरा केला जाईल. पुराणानुसार याच दिवशी श्रीगणेशाचा जन्म झाला होता. ईद ए मिलाद किंवा मीलाद उन नबी इस्लाम धर्म मानणाऱ्यांसाठी मोठा सण आहे. १६ सप्टेंबर रोजी ईदची सुट्टी आहे. शाळा, कॉलेजच्या विद्यार्थ्यांना या सुट्टीचा आनंद घेता येणार आहे.

शुक्रवारी ६ सप्टेंबर रोजी उत्तर भारतात हरतालिकेची सुट्टी असेल. ७ सितंबर २०२४, शनिवार रोजी संपूर्ण भारतात गणेश चतुर्थीची सुट्टी असेल. १३ सितंबर २०२४, शुक्रवारी राजस्थानमध्ये रामदेव जयंती असेल.१४ सितंबर २०२४, शनिवारी केरळात ओणमची सुट्टी असेल. १६ सितंबर २०२४, सोमवारी पूर्ण भारतात ईद-ए-मिलादची सुट्टी असेल. १६ सितंबर २०२४, सोमवारी उत्तर भारतात विश्वकर्मा जयंतीची सुट्टी असेल.

याव्यतिरिक्त शाळा, कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी रविवारची हक्काची सुट्टी मिळेल. १ सप्टेंबर, ८ सप्टेंबर, १५ सप्टेंबर, २२ सप्टेंबर आणि २९सप्टेंबर रोजी शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शाळेची सुट्टी असेल.

पान १ वरून...

## मराठवाड्यात पावसाचा

सतर्कतेचा इशारा दिलाय. हिंगोलीत पुराच्या पाण्यातून ६ जणांचं रेस्क्यू करण्यात आलं. सेनगावमध्ये एक शेतकरी कुटूंब शेतात राहत होतं. मुसळधार पावसामुळे हे कुटुंब शेतात अडकून पडलं. रात्री उशिरा रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल होत पुरात अडकलेल्या महिला आणि मुलांची सुखरुप सुटका केली.

कारंजा तालुक्यात पुराच्या पाण्यात एक वृद्ध व्यक्ती वाहून गेल्याची घटना घडलीये. जयपूर- शाह परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे नदी नाल्यांना पूर आलाय. या पुराच्या पाण्यातून वाट काढताना हा वृद्ध व्यक्ती वाहून गेला. सुदैवाने गावकऱ्यांनी पुढे काही अंतरावर पुरात उडया मारल्या आणि वृद्धाचा जीव वाचवलाय. त्यामुळे पुरांच्या पाण्यातून वाट काढू नये असा अवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आलंय.

परभणीमध्ये अतीमुसळधार पावसामुळे गोदावरी, दुधना, करपरा या नद्यांनी धोक्याच्या पातळी ओलांडलीय. यामुळे अनेक ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचल्यानं, वाहतूक ही ठप्प झालीय. पावसामुळे हजारो हेक्टर वरील पिके ही पाण्याखाली गेली असून शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालंय.

जालन्यातील मंठा तालुक्यात ढगफुटी सदृश पाऊस झालाय. त्यामुळे पाटोदा, मंठा, सावंगी, पेवा, देवठाणा या गावांना पुराचा फटका बसलाय. गावामध्ये पाणी भरण्याची शक्यताये. त्यामुळे २०० ते २५० गावकऱ्यांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलंय.

मुसळधार पावसाने बीडच्या धारूर तालुक्यातील गुणवरा नदीला पूर आलाय. पुराचं पाणी नदी काठच्या घरांमध्ये शिरलंय तर शेती पाण्याखाली गेलीये. परिसरातील अनेक नदी नाले ओसंडून वाहतायत.

यवतमाळच्या बंदी भागात पुराचं पाणी शिरलंय. यामुळे दराटी गावाला तलावाचे स्वरूप आल्याचं पहायला मिळतय. अनेक घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे, नागरिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालंय. यामुळे प्रशासनाने तातडीने नागरिकांसाठी उपाययोजना कराव्या, अशी मागणी ग्रामस्थांनी केलीय.

## पुण्यात गुन्हेगारांना मोकाट रान; नाना पेठेनंतर हडपसरमध्ये कोयत्याचे वार करुन फायनान्स मॅनेजरला संपवलं

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/ प्रतिनिधी** : पुण्यात कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहे. पुण्यात बारा तासात दुसरा खून झाला आहे. काल एकाच दिवशी दोघांची हत्या झाली आहे. मरण पावलेल्यांमध्ये एक माजी नगरसेवक तर दुसरा फायनान्सर आहे. फुरसुंगी सासवड रोड पोलीस ठाण्यापासून तीनशे मीटर अंतरावर ही घटना घडली आहे. कोयत्याने वार करुन निर्घृण खून करण्यात आला आहे. कुलकर्णी हा एक फायनान्स कंपनी चालवत असल्याची प्राथमिक माहिती आहे. व्याजाने दिलेल्या पैशांच्या वादातून ही हत्या झाली असण्याची शक्यता आहे.हडपसर भागात वासुदेव कुलकर्णी नावाच्या व्यक्तीची रात्री अडीच वाजता हत्या करण्यात आली आहे. कुलकर्णी हे पुण्यातील एका फायनान्स कंपनीत मॅनेजर म्हणून काम करत होते. गाडीतळ परिसरात असलेल्या त्यांच्या घरासमोर शतपावली करताना अज्ञाताने धारदार शस्त्राने कुलकर्णी यांचा खून करण्यात आला आहे.




## बाप्पाच्या आगमनाआधी सोनं झालं स्वस्त; २४ कॅरेटचा भाव ऐकून ग्राहकांना दिलासा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/ प्रतिनिधी** : मागील आठवड्यात सोन्याच्या दरात चांगलीच वाढ झाली होती. मात्र, आता आठवड्याच्या सुरुवातीलाच सोन्याचे भाव गडगडले आहेत. चांदीच्या दरातही शुक्रवारी घट झाली होती. त्यानंतर आजही वायदे बाजारात चांदी जवळपास १ हजार रुपयांनी स्वस्त झाली आहे. सकाळी बाजार उघडताच सोनं २७० रुपयांनी स्वस्त झालं होतं. आज २४ कॅरेट सोनं प्रतितोळा ७२,७७० रुपये इतके आहे.

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हमध्ये सप्टेंबरमध्ये व्याज दरात कपात होण्याची शक्यता आहे. तर, दुसरीकडे अमिरेका निवडणुकांचा परिणामही सोन्याच्या किंमतीवर झाला आहे. यूएस फेडरल रिझर्व्हचे प्रमुख जेरोम पॉवेल यांनी नोकरदारांच्या स्थितीमुळं व्याजदरात कपात जवळपास निश्चित असल्याचे संकेत दिले होते. त्याचमुळं सोन्याचे दर त्याच श्रेणीत व्यवहार करत आहेत. भारतात सध्या गणेशोत्सवाची धूम आहे. अनेक जण बाप्पाचा सोन्या-चांदीचे दागिने भेट देतात. त्यामुळं तुम्ही देखील सोनं-चांदी खरेदी करण्याचा विचार करत असाल तर, ही संधी तुमच्यासाठी चांगली ठरणार आहे.

आज सोनं-चांदीच्या दरात घसरण झाली आहे. २२ कॅरेट सोन्याच्या दरात २५० रुपयांची घट झाली आहे. त्यानुसार प्रतितोळा सोनं ६६,७०० रुपये आहे. तर, २४ कॅरेट सोन्याच्या दरात २७० रुपयांची घसरण झाली असून आज प्रतितोळा ७२,७७० रुपये इतके आहे. त्याचबरोबर १८ कॅरेट सोन्याच्या दरात २१० रुपयांची घट झाली आहे. त्यामुळं आज प्रतितोळा सोनं ५४,५७० रुपये इतके आहे.

# '..तर मस्जिदमध्ये घुसून मारु' वक्तव्य भोवलं, नितेश राणेंवर गृह विभागाची मोठी कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/ प्रतिनिधी** : मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या प्रकरणी आमदार नितेश राणे यांच्यासह आयोजक दिगंबर गेंट्याल यांच्यावर अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आले आहे. रामगिरी महाराजांना विरोध केला तर मस्जिदमध्ये घुसून एका एकाला मारू असं विधान नितेश राणेंनी केलं होतं. यामुळे मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या असून हे विधान नितेश राणेंना भोवण्याची शक्यता आहे.



अहमदनगरमध्ये रामगिरी महाराजांच्या समर्थनार्थ एका मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये हिंदू समाजातील अनेकांनी सहभाग घेतला होता. त्यावेळी नितेश राणेंनी ही धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

अहमदनगरच्या तोफखाना पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अहमदनगर येथे सकल हिंदू समाजाच्या वतीने महंत रामगिरी महाराजांच्या समर्थनार्थ मोर्चा आयोजित करण्यात आला होता. मोर्चाच्या समारोपाच्या भाषणात मुस्लिम समाजाला धमकवल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भडकाऊ भाषण देणे आणि धार्मिक भावनांना ठेच पोहोचवण्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.एका कार्यक्रमाला संबोधित करताना त्यांनी मुस्लिम समाजाला उघड धमकी दिली होती. एका एकाला पकडून मारु, असं विधान त्यांनी केलं होतं. यानंतर त्यांच्याविरोधात कलम ३०२, कलम १५३ सहित अनेक कलमांअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नितेश राणेंविरोधात एक नव्हे तर दोन प्रकरणात गुन्हे दाखल आहेत. पहिले प्रकरण श्रीरामपूर आणि दुसरे तोपखाना पोलीस ठाण्यात नोंदवले गेले. नितेश राणेंनी मुस्लिम समाजाला उघडपणे धमकी दिली, असे तक्रारदाराचे म्हणणे आहे. महंत रामगिरी महाराज यांनी मुस्लिम समाजाच्या पैंगबर यांच्याबद्दल वादग्रस्त विधान केले होते. त्यानंतर या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

सांप्रदायिक हिंसा पसरवण्याचा प्रयत्न

महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये रामगिरी महाराजांच्या समर्थनार्थ मोर्चा काढण्यात आला होता. अहमदनगरमध्येदेखील मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी नितेश राणेदेखील सहभागी झाले होते. नितेश राणेंचे विधान सोशल मीडियात चर्चेत राहिले. यानंतर एमआयएमचे नेते वारिस पठाण यांनी व्हिडीओ शेअर करुन नितेश राणे धार्मिक हिंसा पसरवण्याचा प्रयत्न करतायत, असा आरोप केला. तसेच त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणीदेखील त्यांनी केली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याची चैन चोरणाऱ्या सराईत चोरट्याला कोपरखैरणे पोलिसांनी ठोकल्या बेड्या



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** कोपर खैरणे मधील एका ७९ वर्षीय वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याची चैन चोरणारा चिंकी उर्फ दिपेंद्र जालीम या अट्टल चोराला कोपरखैरणे मोठ्या शिताफीने अटक केली आहे. कोणतेही धागेदोरे नसताना यांत्रिक मदतीच्या आधारे चिंकी याला ताब्यात घेत त्याच्या कडून चोरलेली चैन आणि त्याच परिसरातील एका महिलेचे चोरलेले मंगळसूत्रही पोलिसांनी हस्तगत केले आहे. तपासात आरोपीवर या गुन्ह्यासह उत्तर प्रदेश मध्ये जबर चोरीचे तब्बल ११ गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले असून, पोलीस अधिक तपास करत आहेत.

### उंचडा गावाला कयाधू नदीच्या पाण्याने घातला वेढा



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड मध्ये मुसळधार पाऊस सुरू असल्याने नांदेडच्या हदगाव तालुक्यातील उंचाडा येथे कायधु नदीला पूर आला आहे. नदीचे पाणी गावात आणि शेतीला वेढा घातल्याने ३० ते ३५ शेतकरी शेतामध्ये अडकले असून त्यांना पाण्यातून काढण्यासाठी एस डी आर यफ टीम दाखल दाखल झाली आहे. बचाव कार्य सुद्धा सुरू याठिकाणी राबवण्यात आले आहे. गावात पाणी शिरल्याने घराचे सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्याचे जनावरे पाण्यामध्ये वाहून गेल्याची माहिती समोर येत आहे. एस डी आर एफ टीम सुद्धा गावामध्ये दाखल झाली आहे. जिल्ह्यात पावसाने धुमाकूळ घातला आहे.

### अर्धापूर तालुक्यातील शेलगाव खुर्द आणि शेलगाव बुद्रुक गावाला पुराचा वेढा



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड जिल्ह्यात पावसाने दाणादाण उडविली आहे.मुसळधार पावसामुळे नदी नाल्यांना पूर आला आहे. नांदेडच्या अर्धापूर तालुक्यातील शेलगाव (खुर्द ) आणि शेलगाव (बुद्रुक) या गावाला पुराच्या पाण्याने वेढा घातला आहे. या दोन गावांचा मागील ४८ तासांपासून संपर्क तुटला आहे. गावाच्या बाजूने मेंढला नाला आहे. समोर आसना नदीला हा नाला जाऊन मिळतो आहे. परंतु आसना नदीला मोठा पूर आल्याने या नाल्याचे पाणी शेलगावात शिरले आहे.

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी घेतले कोल्हापूरच्या अंबाबाई देवीचे दर्शन



**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापूर जिल्हा दौऱ्यावर असताना भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अंबाबाई मंदिराला भेट दिली आहे. यावेळी राष्ट्रपतींनी देवीला कुंकुमार्चन अभिषेक करुन एकारती, पंचारती व कर्पुरआरती केली. देवीचे दर्शन घेतेवेळी राष्ट्रपतींसोबत त्यांची कन्या इतिश्री मुर्मू व भाऊ तारिणीसेन टुडू यांनीही देवीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर त्यांनी मंदिराविषयी आणि मंदिरातील किरणोत्सव सोहळा विषयी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्याकडून माहिती घेतली.

# मुंगळा येथे ढगफुटीप्रमाणे मुसळधार पाऊस सुरु

## शेतकरी हवालदिल झाला; हातातोंडाशी आलेले पिके नष्ट होण्याची शक्यता

दैनिक आपला विदर्भ

■ अजय चोथमल

**मालेगाव :** मालेगाव तालुक्यातील मुंगळा शेत शिवारात काल व आज सकाळ पासुन हलक्या स्वरूपाचा पाऊस चालू होता मात्र सायंकाळी साडेचार वाजता पासून ढगफुटी झाली असून मुसळधार पाऊस पडला असुन. या पावसा मुळे अनेक शेतकऱ्याच्या शेतातील मुग. उडीद.सोयाबिन तुर संत्रा अदी पिकाचे नूकसान झाल्याचे दिसून येत आहे. यामुळे येथील शेतकरी चिंताग्रस्त हवालदिल अवस्थेत दिसत आहे. मुंगळा येथे सुरवातीपासून संपुर्ण पावसाळ्यात ज्यास्त प्रमाणात पाऊस पडला आहे. मात्र आज सकाळ पासुनच पाऊस सुरू होता. काल दुपारी४वाजता पासुन ढगफुटी प्रमाणे पाऊस पडत असून दि. २/९ रोजी १२ वाजता पासून मुसळधार पाऊस सुरू आहे पोळा सणावर पावसाचे सावट अनेक शेतकऱ्याच्या शेतातील सोयाबिन सोसाट्याचा हवा सूरु असल्याने सोयबीन पिके आडवी झाल्याने पिकाला धोका निर्माण झाला आहे. गावातील गुरे, शेळ्या पावसामुळे घरी बांधलेल्या होत्या शेतातील





नधीनाले रस्ते पावसाने तुडुंब भरून वाहत आहेत. धरणे भरली आहेत. पांदण रस्त्याने जाणाऱ्या नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे. सततच्या पावसामुळे व ढगाळ वातावरणा मुळे पिकावर रोगराई पडत आहे, त्यामुळे सोयाबीन पिके पिवळी पडत असून मोज्याक बिमारी जोर मारत आहे. आधीच शेतकरी खताच्या अवशीदीच्या भाववाढी वाढीमुळे व सोयाबीन भाव कमी मुळे शेतकरी अडचणीत सापडला असून शेतकरी कर्जबजारी च्या फासातुन मुक्तता मिळणे अवघड दिसत आहे. आसाच पाऊस सुरु राहील्यास सोयाबीन पिके नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# महाराष्ट्रात दहीहंडीच्या कार्यक्रमाने नांदेड शहराचे लक्ष वेधून घेतले- ॲड. अनुप आगाशे

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** कार्यक्रमाचे आयोजक ॲड. अनुप आगाशे जिल्हाध्यक्ष वि. आ. आम आदमी पार्टी नांदेड यांच्या दूरदर्शी प्रयत्नांमुळे या वर्षी नांदेड मध्य भारतातील सर्वात आवडत्या सण दहीहंडीमध्ये विलक्षण बदल झाला. त्यांच्या दहीहंडीच्या कार्यक्रमाने या प्राचीन सणाचे सार तर उलगडलेच पण नांदेडच्या मान्यवरांचेही लक्ष वेधून घेतले.

कार्यक्रमाचे उद्घाटक संग्राम घाडगे संघटन मंत्री महाराष्ट्र राज्य, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अविनाश देशमुख सहसचिव महाराष्ट्र राज्य व बालाजीभाऊ देशमुख अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटना जिल्हा



प्रसिद्धीप्रमुख हिगोली यांच्या प्रमुख उपस्थितीने हा भव्य सोहळा नांदेडच्या कैलास नगर भागात पार पडला. त्याची चमक अशी होती की येत्या काही वर्षांत ती शहराच्या स्मरणात कायम राहील. या कार्यक्रमात संग्राम गाडगे महाराष्ट्र संघटन मंत्री म्हणाले की, महाराष्ट्रातील नऊ थराची दहीहंडी पुढील वर्षात नांदेड येथे होणार आहे. या आनंद सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी एकत्र आलेले सर्व प्रमुख पाहुणे. संग्राम गाडगे अविनाश देशमुख यांनी कार्यक्रमाचे ग्लॅमर वाढवून उत्साहात भर घातली.

दहीहंडी चे पहिले पारितोषिक मारणारे जय बजरंग दल मित्र मंडळ यांनी दहीहंडी फोडून पहिले बक्षीस प्राप्त केले. तसेच या कार्यक्रमांमध्ये काही मान्यवर यांचे पुरस्कार देऊन सन्मानित सुद्धा करण्यात आले या कार्यक्रमास आदिल जागीदार युवा जिल्हाध्यक्ष, अजित बनसोडे माजी युवा जिल्हाध्यक्ष तसेच ॲड. शिलवांत भगत ॲड. गची ॲड. जयपाल ढवळे ॲड. अंकुश बर्डे ,राजू गायकवाड, बंडू गिरगावकर, शैलेंद्र शर्मा ,उत्तम लांडगे सचिन शिंदे, यांनी कार्यक्रमातील प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.

# माजी खासदार रावसाहेब पाटील दानवे यांनी साजरा केला बैलपोळा सण



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** आज बैलपोळा सण हा मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे आणि त्याच पार्श्र्वभूमीवर जालना लोकसभा मतदार संघाचे भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते जालना जिल्ह्याचे माजी खासदार रावसाहेब पाटील दानवे यांनी त्यांच्या गावातील बैलपोळा बळीराजाचा उत्सव साजरा केला. त्यांच्या नाळणी तालुका भोकरदन या गावी शेतात बैलकपोळा निमित्त बैलांची सजावट करत हा बैलपोळा सण मोठ्या उत्सवांमध्ये साजरा केला आहे, यावेळी त्यांनी बैलांची विधिवत पूजा करत महिलांना पुरणपोळी भरवत सपत्नीक बळीराजाची पूजा केली आहे.

# मनसेच्या लढ्याला यश, औद्योगिक आस्थापनांना शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** मनसेने महाराष्ट्रातील उद्योगांमध्ये स्थानिक भूमीपुत्रांना ८० टक्के नोकऱ्या द्यायलाच हव्यात यासाठी लढा सुरु केला होता. मनसेच्या या लढ्याला यश आले असून जिल्हा उद्योग केंद्रातर्फे आता नवी मुंबईतील औद्योगिक आस्थापनांची उद्यम पोर्टलवर नोंदणी झाली आहे अशा आस्थापनांना शासनाच्या नियमांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. गणपती पर्यंत यातील किती औद्योगिक आस्थापने या निर्णयाची अंमलबजावणी करतात हे पाहू अशी प्रतिक्रिया मनसे शहराध्यक्ष गजानन काळे यांनी दिली आहे

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भीमाशंकर येथे घेतले महादेवाचे दर्शन



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** भीमाशंकर दर्शनासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुलगा श्रीकांत शिंदे यांच्यासोबत श्री क्षेत्र भिमाशंकरला मुख्य शिवलिंगावर लघुरुद्र महाषिशेक केला. आज शेवटचा सोमवार असल्याने भीमाशंकराचे दर्शन घेतले त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

# पोलिसांच्या ताब्यात असताना तरुणाचा धावत्या रेल्वेमधून पडून मृत्यू, उपनिरीक्षकासह दोन अंमलदार निलंबित

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** अल्पवयीन मुलगी हरविल्याची तक्रार तिच्या नातेवाईकांनी वाशिंद पोलीस ठाण्यात दिली होती. या तक्रारीची दखल घेत पोलीस पथकाने प्रियकर आणि प्रेयसीचा शोध सुरू केला. एक महिन्याच्या तपासानंतर दोघे मध्यप्रदेश राज्यातील एका पोलीस ठाण्याच्या हद्दीत असल्याची माहिती पोलिसांना समजली. त्यानंतर दोघांना ताब्यात घेऊन राजधानी एक्सप्रेसने येत असतानाच प्रियकराचा धावत्या रेल्वेमधून पडून संशयास्पद मृत्यू झाला होता. अनिकेत जाधव (वय २४) असे मृत तरुणाचे नाव आहे.

तरुणानं रेल्वेच्या बोगीमधील टॉयलेटच्या खिडकीतून उडी मारून आत्महत्या केल्याचा पोलिसांनी दावा केला. मात्र, तरुणाच्या नातेवाईकांनी ग्रामीण वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडे संशय व्यक्त करत तक्रार केली. आमचा मुलगा पोलिसांच्या ताब्यात असताना त्याने आत्महत्या नव्हे तर त्याची हत्या झाल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले. या तक्रारीवरून एक पोलीस उपनिरीक्षक आणि दोन पोलीस अंमलदार अशा तिघांना निलंबित करण्यात आले. त्यांची चौकशी सुरू असल्यानं ठाणे ग्रामीण पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

मध्य प्रदेशला पळून गेले– मिळालेल्या माहितीनुसार भिवंडी तालुक्यातील पडघा पोलीस ठाण्यातील पाच्छापूर येथील अनिकेत जाधव आणि शहापूर तालुक्यातील नात्यातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी या दोघांमध्ये प्रेम होते. प्रेमातून त्यांनी पळून जाण्याचा निर्णय घेतला. २५ जुलै रोजी दोघेही लग्न करण्याच्या उद्देशानं पळून गेले. मात्र, त्यावेळी अनिकेत याने अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याची तक्रार मुलीच्या नातेवाईकानं वाशिंद पोलीस ठाण्यात दिली होती.

अपघाती मृत्यू झाल्याची नोंद– अल्पवयीन मुलीच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीनुसार पोलीस पथकानं दोघांचा शोध सुरू केला. ते दोघे महिनाभरापासून मध्यप्रदेश राज्यातील एका शहरात असल्याची माहिती वाशिंद पोलिसांना मिळाली. वाशिंद पोलिसांनी आणि मुलीच्या नातेवाईकांनी मध्यप्रदेशातील पोलिसांच्या मदतीनं मध्यप्रदेश येथील पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्या ठिकाणाहून अनिकेत आणि त्याच्या सोबत असलेली अल्पवयीन मुलगी दोघांना २५ ऑगस्ट रोजी मध्यप्रदेश येथून ताब्यात घेण्यात आले. महाराष्ट्र राज्यात घेऊन येत असताना राजधानी एक्सप्रेस गॉलियर रेल्वे स्टेशन नजीक असलेल्या मुराई रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत रेल्वे येताच अनिकेतनं बोगीच्या टॉयलेटच्या खिडकीतून उडी मारून आत्महत्या केल्याचं वाशिंद पोलिसांनी त्यावेळी सांगितले. त्यामुळं त्याचा अपघाती मृत्यू झाल्याची नोंद मुराई रेल्वे पोलीस ठाण्यात करण्यात आली.

आंदोलनाचा दिला होता इशारा– अनिकेतच्या नातेवाईकांनी त्याचा मृत्यू नव्हे तर त्याचा घातपात असल्याचा आरोप केला होता. विशेष म्हणजे पोलिसांच्या ताब्यात असतानाही अनिकेतचा रेल्वे अपघातात मृत्यू होणं संशयास्पद असून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी अनिकेतच्या कुटुंबीयांनी केली. याबाबत सखोल चौकशी न झाल्यास उग्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा रिपाइंचे किरण चन्ने यांनी दिला. या घटनेची गांभीर्यानं दखल घेऊन ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. स्वामी यांनी अनिकेतला मध्यप्रदेशमधून ताब्यात घेणारे वाशिंद पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक वांगड, पोलीस अंमलदार जोगदंड आणि चलवादी या तिघांना ३१ ऑगस्ट रोजी निलंबित केले. त्यांची चौकशी सुरू केल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक हर्षवर्धन बर्वे यांनी दिली आहे.

## वृत्तविशेष...

### जर्मनीत कुशल वाहन चालकास संधी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : जर्मनी या देशातील बाडेन वुटेनबर्ग या राज्यास महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ पुरविण्याबाबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. कराराप्रमाणे बाडेन वुटेनबर्ग या राज्यास कुशल वाहनचालक (बस, रेल्वे,ट्रक,हलकी व जड वाहने) या करीता अर्ज मागविण्यात आले आहे. याकरीता www.maa.ac.in ही वेबसाईट असून या वेबसाईटवर अर्ज करावयाचे आहे. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बुलडाणा कार्यालयातर्फे हेल्प डिस्क तयार करण्यात आला असून अर्ज भरण्याकरीता अडचणी येत आहे किंवा ज्यांना अर्ज भरण्याकरीता मदत पाहिजे अशा अर्जदारांनी कार्यालयातील मदत कक्षात कार्यालयीन वेळेत संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : अल्पसंख्याक समुदयातील विद्यार्थ्यांकरीता परदेशात पदव्युत्तर पदवी व पीएचडी अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढील वेबसाईटवर अर्ज डाऊनलोड करुन तो परिपूर्ण व आवश्यक त्या कागदपत्रासह दि. ६ सप्टेंबर २०२४ पर्यंत सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत समक्ष किंवा पोस्टाने समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च रोड, पुणे-४११००१ येथे सादर करावा. ऑनलाईन पोर्टल सुरु झाल्यास त्याबाबत माहिती देण्यात येईल. अर्जाचा नमुना व अधिक सविस्तर माहितीसाठी शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील ताज्या घडामोडी या लिंकवर जाऊन भेट द्यावी. असे आवाहन सहाय्यक आयुक्त डॉ. अनिता राठोड, समाज कल्याण बुलडाणा यांनी केला आहे.

### गणेशोत्सवाचे अर्ज सादर करण्यासाठी मुदत वाढ

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना राज्य प्रशासनाकडून पुरस्कार देण्यात येणार आहे. यात सन २०२४ या वर्षीच्या सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेत मंडळांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या शासन निर्णय क्रमांक:- पुलदे-२०२४/प्र.क्र.१११ / सां. का. २ वतीने महाराष्ट्र राज्य सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४' चे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी अर्ज स्वीकारण्याची अंतिम दि. ५ सप्टेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. गणेशोत्सव मंडळांनी संपूर्ण भरलेला अर्ज mahotsav.pldagmail.com या ईमेल आयडी वर पाठवणे आवश्यक आहे. सदर स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. स्पर्धेचा अर्ज पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी. मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून स्पर्धा निःशुल्क आहे. तरी जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी, बुलडाणा यांनी केले आहे.

### बुलढाण्यात भर पावसात बैल पोळा सण साजरा



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : बुलढाणा जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. या पावसात ही बैल पोळ्याचा सण शेतकऱ्यांनी उत्साहात साजरा केला आहे. बैल पोळ्यानिमित्त काही शेतकऱ्यांनी बँड बाजासह वाजत गाजत आपल्या पशुधनाची शहरातून मिरवणुका काढली आहे. या मिरवणुकीमध्ये आमदार संजय गायकवाड यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेसाठी आता सप्टेंबरमध्येही नोंदणी सुरू राहणार -महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

**मुंबई/प्रतिनिधी** : 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' या योजनेसाठी राज्यातील पात्र महिलांना आता सप्टेंबर २०२४ मध्येही नोंदणी करण्यास परवानगी देण्यात आली आहे, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.मंत्री कु.तटकरे म्हणाल्या की, राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची निर्णय भूमिका मजबूत करण्यासाठी 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. यापूर्वी दि. ३१ ऑगस्ट २०२४ पर्यत नोंदणी करण्यास मुदत देण्यात आली होती. आता ही नोंदणी सप्टेंबर २०२४ मध्येही सुरू राहणार आहे. तरी अधिकाधिक महिलांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे.

# पोळ्यानिमित्त रविकांत तुपकरांनी सहपरिवार केले बैलांचे पूजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी आपल्या मूळ सावळा या गावी गावकऱ्यांसमवेत पोळा साजरा केला. पोळ्यानिमित्त बैलांना सजवून तुपकरांनी त्यांचे पूजन केले.भर पावसात सावळा गावी पोळा साजरा करण्यात आला.

ग्रामीण भागात पोळा हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो..आज जरी बैलांची संख्या कमी होत असली तरी तुपकरांच्या सावळा गावी मात्र शेतकऱ्यांनी बैलजोड्या जपल्या आहेत.. दरवर्षी रविकांत तुपकर हे त्यांच्या मूळ गावी पोळा साजरा करतात.. गावकऱ्यांना भेटतात त्यांची आस्थेने चौकशी करतात..यावर्षीही





त्यांनी आपल्या सावळा गावी पोळा साजरा करून शेतकऱ्यांना पोळ्यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

## सर्व धर्मीयांचे प्रतिक असणारा बैलपोळा बेलगाव येथे संपन्न

### बैल पोळा शेतकऱ्याच्या जीवलग मित्राचा सन्मान






दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव** : बेलगाव मध्ये अत्यंत शेतकरी मित्र यांच्या बैलाचा गावातील मानकरी यांच्या हस्ते पुजन करुन वाजत गाजत गावातुन बैलाना नेतात अत्यंत बैल सजावट करण्यात येते नक्षीकाम.बेगड डोक्याला बाशिंग गळ्यात कवड्या व घुंगराच्या मला नवी. व्यसन कासरा. पाया चांदीचे किंवा करदोड्याचे तोडे घालतात त्याला खायला गोड पुरणपोळी व सुग्रास अन्नाचा नैवेद्य देतात बैलाची निगा राखणाऱ्या बैल करी व्यक्तीस नवीन कपडे देण्यात येते या सणासाठी शेतकऱ्यांमध्ये व बाल गोपाला मध्ये उत्साह असतो. शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणे त्याचा साजश्रुगार करतात बैल सजवितात व पोळ्याच्या मिरवणुकीत भाग घेतात गावच्या सीमेजवळच्या गावा नजीक आंब्याच्या पानांचे एक मोठे तोरण करून बांधतात या सना दिवशी महाराष्ट्रातल्या खेड्यामधल्या प्रत्येक घराला आंब्याच्या पानाचे तोरण बांधले जाते त्यांजवळ गावातल्या सर्व बैल जोड्या वाजंत्री सनई ढोल ताशे वाजवत एकत्र आणल्या जातात गावातील मानकरी यांच्या हस्ते बैलाला कुंकू लावुन मंगलाष्टकं म्हणल्या जातात त्यानंतर बैलाला घरोघरी नेऊन पूजन करून व नैवेद्य देण्यात येते यावेळी गावातील नागरिक व नवयुवक मोठ्या संख्येने उपस्थित होते




अभिजीत दिनोरे यांचे बैल ठरले सार्वजनिक पोळयात आकर्षण

## खामगावात कावड उत्सव मोठ्या उत्साहात साजरा

दैनिक आपला विदर्भ

**खामगाव/प्रतिनिधी** : श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी शहरातून भव्य कावड यात्रा काढण्यात आली. कावडयात्रा उत्सवाला शहरात वर्षागणिक भव्य-दीव्य स्वरुप येत असते. शहरातून निघालेल्या कावडयात्रेत कावडधारी मंडळ सहभागी झाले होते. 'हर बोला महादेव' च्या गजराने अवघे शहर दणाणून गेले होते. श्रावण महिना हिंदु संस्कृतीत अतिशय पवित्र मानला जातो. श्रावणातील सोमवारला विशेष महत्व असून सोमवारी शिवपिंडीला पवित्र जलाव्दारे अभिषेक घालण्याची परंपरा आहे. त्यामुळे प्रत्येक श्रावण सोमवारी शिवभक्त कावडधारी वेगवेगळ्या



तिर्थस्थळावरून पवित्र जल आणून शिवमंदीरात जलाभिषेक करीत असतात. बुलढाणा जिल्ह्यात उत्सवांचे शहर म्हणून ओळखले जाणाऱ्या खामगाव शहरात या कावड यात्रा उत्सवाला भव्य-दिव्य स्वरूप येताना दिसत आहे. प्रत्येक श्रावण सोमवारी शहरातील विविध मंडळांचे शेकडो कावडधारी तीर्थस्थळांवरून खांद्यावर कावड घेवून जल आणत असतात. आज श्रावणातील शेवटचा सोमवार असून श्री मानाची कावडधारींनी चांगदेव मुक्ताई येथून पवित्र जल आणून वाजत-गाजत कावडधारींची शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये श्री नवयुवक मानाची कावड मंडळाच्या वतीने आघोरी पूजा चा देखावा सादर करण्यात आला.

### एवढ्या मोठ्या उंचीच्या नेत्याचं मन इतकं छोटं, अमृता पवारांचं छगन भुजबळांना सडेतोड उत्तर

**नाशिक/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर येवला मतदारसंघात मानापमान नाट्य रंगल्याचे दिसून येत आहे. नांदूरमध्यमेश्वर ग्रामपंचायत अंतर्गत अंगणवाडी आणि आरोग्य केंद्राच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी निमंत्रित केले नसल्यानं राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद प्रशासन आणि माजी जि प सदस्य अमृता पवार, सुरेखा नरेंद्र दराडे यांच्या विरोधात विधानसभा अध्यक्षांकडे तक्रार केली होती. आता यावरून अमृता पवार यांनी छगन भुजबळांना सडेतोड उत्तर दिले आहे.

## वडार समाज संघ महाराष्ट्र राज्याच्या प्रदेशाध्यक्षपदी जगन्नाथ फुलारे यांची नियुक्ती

### नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : पुणे येथील बैठकीत वडार समाज संघ महाराष्ट्र राज्याच्या प्रदेशाध्यक्षपदी मा. जगन्नाथजी फुलारे साहेब छ.संभाजी नगर यांची निवड झाल्याने वडारसमाजात एकच जल्लोष करण्यात आला.

वडार समाज संघ ही संघटना समाजाच्या शैक्षणिक,आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी सातत्याने शासनस्तरावर सनदशीर मार्गाने आपल्या हक्कासाठी न्याय्य लढा देत आहे.परंतु अनेक वेळा उपोषणे , आंदोलने करूनही सरकारी धोरणे उदासीन असल्याने समाज सर्वांगाने पिढ्यान्- पिढया गरीबीत जीवन व्यतित करत आहे. यांत्रिकीकरणाने पारंपारिक उद्योग,व्यवसाय,कामधंदे संपलेत. रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत असल्याने मुलां- बाळांना शिक्षण घेता येता नाही यासारख्याच अनेक गंभीर समस्यातून वर काढण्यासाठी आणि वंचित समाजास न्याय




मिळवून देण्यासाठी चा लढा अधिक तीव्रतेने गतिमान करण्यास सक्षम नेतृत्व म्हणून उच्चशिक्षित,अभ्यासू व खंबीर व्यक्तीमत्व मा.जगन्नाथ फुलारे साहेब छत्रपती संभाजी नगर यांची राज्य समन्वय समितीने एकमताने वडार समाज संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड केली. सभेच्या अध्यक्षपदी मा.राकेशजी विटकर( माजी अध्यक्ष )हे होते

सभेत अन्य पदाधिकाऱ्यांचीही निवड करण्यात आली कार्याध्यक्ष-श्री. रामचंद्र मंजुळे, ज्येष्ठ उपाध्यक्ष-श्री.बी.के. गायकवाड, सचिव- श्री.डॉ. लक्ष्मण बामणे,उपाध्यक्ष-श्री.संजय देवकर,सरचिटणीस -श्री. दिलीप गुंजाळ,कोषाध्यक्ष-श्री. रमेश जेठे, या नवनिर्वाचित अध्यक्षांनी संघटन बांधणीसह समाजातील बेरोजगार तरुणांसाठी स्वयंरोजगार मेळावा मार्गदर्शन तसेच शासनस्तरावर समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी सातत्याने अभ्याससपूर्ण लढा देण्याचा संकल्प ही व्यक्त केला. सभेस विदर्भ अध्यक्ष महादेवराव कुसळकर, रामदास सुरे( से.नि. P.S.I.) मनोहर विटकर, अशोक कुलाल व सर्व समन्वय सदस्य उपस्थित होते.

# ई-पिक पाहणीसाठी १५ सप्टेंबर अंतिम मुदत

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी प्रकल्प ई-पिक पाहणीची सुरुवात दि. १ ऑगस्टपासून सुरु झाली आहे. यात सातबारावर पिकपेरा स्वतः शेतकऱ्यांनी अॅन्ड्राईड फोनद्वारे नोंदणी करावी लागणार आहे. शेतकरीस्तरावर पिक पाहणी करण्यासाठी अंतिम दि. १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत आहे. जिल्ह्यातील ९ लाख २५ हजार ६८८ हेक्टर क्षेत्रापैकी ३ लाख ५६ हजार १२० हेक्टर क्षेत्र, तसेच ६ लाख ६१ हजार १४२ खातेदारांपैकी ५ लाख ५७ हजार ७२७ खातेदारांनी पिकांची ई-पिक पाहणी करून मोबाईल ॲपद्वारे सातबारावर नोंदणी केली आहे. आजवर जिल्ह्याची ई-पिक पाहणीची नोंदणी फक्त ४७.४९ टक्के क्षेत्रावर झाली आहे. तसेच खरीप हंगाम २०२४ डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत जिल्ह्यातून निवड झालेल्या बुलडाणा तालुक्यात आजपर्यंत ५७ हजार ६९४ हेक्टर क्षेत्रापैकी ३० हजार ४५० हेक्टर क्षेत्र, तसेच ७२ हजार ३५१ खातेदारांपैकी ३१ हजार ८४९ खातेदारानी पिकांची ई-पिक पाहणी केली आहे. बुलडाणा तालुका डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत ई-पिक पाहणीची नोंदणी ५३ टक्के क्षेत्रावर झाली आहे. उर्वरीत क्षेत्रावरील शेतकऱ्यांनी ई-पिक पाहणी ॲपद्वारे पिकांची नोंदणी करण्याचे आवाहन आले आहे.




सदर पिक पाहणीची नोंदणी ई-पिक पाहणी व्हर्जन ३.० या मोबाईल ॲपद्वारे करताना अॅन्ड्रॉईड फोन आवश्यक आहे. सदर ॲप गुगल क्रोम अपडेट करून मोबाईलमध्ये इन्स्टॉल करून घ्यावे. ई-पिक पाहणी ॲपद्वारे शेत बांधावर जावुन पिकांची नोंदणी करून माहिती अपलोड करावी. शेतकऱ्याजवळ मोबाईल उपलब्ध नसल्यास किंवा हाताळता येत नसल्यास, संबंधीत गावाचे तलाठी, कोतवाल, तसेच कॉमन सर्व्हिस सेंटर यांची मदत घेवून पिकांची नोंदणी ई-पिक पाहणी ॲपद्वारे करावी. ॲपविषयी अडचण असल्यास तलाठी, तसेच कॉमन सर्व्हिस सेंटर, डीसीएस निवड तालुक्यासाठी सहायक यांची मदत घ्यावी. ई-पिक पाहणीद्वारे पिकांची नोंदणी केली नसल्यास सातबारावर पिक पेरा कोरा राहणार आहे. तो नंतर भरता येत नसल्यामुळे पीक विमा आणि इतर शासकीय अनुदान, लाभ मिळविण्यास अडचण निर्माण होणार आहे. अवेळी पाऊस किंवा इतर नैसर्गिक आपत्तीबाबत पिक विमा मिळण्यासाठी सातबारावर अचूक पीक नोंद असणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी दि. १५ सप्टेंबर २०२४ पूर्वी पिकांची नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.